मो.अ. प्रकरण क्र.२३/२०२२
प्रविण -वि - राजा मदादी
निशाणी क्र.१७ खाली

<u>**अर्जदार क्र.०१ तर्फे साक्षीदार प्रविण पुरूषोत्तम महाजन यांचा शपथेवर सरतपास पुढे सुरु - अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. के. व्ही. परमार.**</u>

०१. माझ्या शपथपत्रातील मजकूर बरोबर असून त्यावर माझी सही आहे. मी माझ्या शपथपत्रासोबत व प्रकरणासोबत कागदपत्रे दाखल केली असून ती कागदपत्रे **निशाणी क्र.२० ते निशाणी क्र.९८** वर आहेत. ( सदर कागदपत्रांना निशाणी देण्यास गैरअर्जदार क्र.०२ तर्फे हरकत घेण्यात आली आहे. सदर हरकतीच्या आधीन राहून त्याला निशाणी देण्यात आली आहे.)

<u>**उलटतपास गैरअर्जदार क्र.०२ तर्फे विधीज्ञ श्री. एन. एच पाचपोर.**</u>

०२. अपघात हा लग्झरी बस व मोटरसायकलमध्ये झाला. लग्झरी बस चालकाकडे हलके वाहन चालविण्याचा पारवाना होता तो परवाना लग्झरी बस चालविण्याकरीता नव्हता. लग्झरी बसचे फिटनेस प्रमाणपत्र व परमिट प्रकरणात दाखल केले नाही. सदर लग्झरी बस ही आंध्रप्रदेश मध्ये नोंदणी झालेली होती. अपघात हा मलकापूर - एदलाबाद रस्त्यावर झाला. सदर बसला महाराष्ट्रामध्ये चालविण्याची परवानगी होती किंवा नाही हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर बसकडे फिटनेस प्रमाणपत्र, परमीट व परवाना नसल्यामुळे अपघाताची नुकसान भरपाई देण्यास गैरअर्जदार क्र.०२ पात्र नाही. लग्झरी बस चालकाकडे परवाना नसल्यामुळे त्याला प्रकरणात पक्षकार केले नाही हे मला सांगता येणार नाही.

०३. आमची मोटरसायकल अतुल दामोदर खर्चे हा चालवत होता व मी मागे बसलेलो होतो. अतुल खर्चे याचा वाहन चालविण्याचा परवाना प्रकरणात दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याला वाहन चालविता येत नसल्यामुळे त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नव्हता. मोटरसायकलची विमा पॉलिसी मी प्रकरणात दाखल

केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्या वेळी आम्ही हेलमेट घातलेले नव्हते. पोलिसांना अपघातस्थळावर हेलमेट मिळून आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा अतुल खर्चे याने निष्काळजी पणाने व भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे झाला व अपघातास तो सुध्दा कारणीभूत आहे. अपघाताच्यावेळी आमची मोटरसायकल मलकापूर कडून तालसवाडाकडे जात होती. हे म्हणणे खरे नाही की, लग्झरी बस तिच्या बाजूने हळू वेगात जात होती. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये बसचालकाची काही चुक नाही.

०४. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामुळे मला कुठलेही अपंगत्व आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजही माझे दैनंदिन कामकाज करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात स्वतःहून आलो व स्वतंत्रपणे आलो. अपंगत्व प्रमाणपत्र निशाणी क्र.७८ हे दिनांक ०१/१२/२०२४ रोजीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रमाणपत्रावर माझा फोटो नाही. हे म्हणणे खरे नाही की, बनावट कागदपत्राच्या आधारे मी चुकीचे अपंगत्व प्रमाणपत्र मिळविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रमाणपत्र निशाणी क्र.७८ हे फक्त आधारकार्डच्या आधारे देण्यात आलेले आहे. प्रमाणपत्र निशाणी क्र.७८ वर फक्त आधारकार्डचा उल्लेख असून इतर कागदपत्रांचा उल्लेख नाही. सदर प्रमाणपत्रावर अपघात कधी झाला तसेच अपंगत्व अपघातामुळे आले व अपंगत्व केव्हा पासून आले याचा उल्लेख नाही. अपंगत्व प्रमाणपत्राचा उपयोग शासकिय सवलती घेण्यासाठी व एस.टी. व रेल्वे प्रवास करण्यकरीता केल्या जातो. प्रमाणपत्र निशाणी क्र.७८ हे अपघातामुळे अपंगत्व आल्याच्या विहीत नमुन्यात आहे किंवा नाही हे मी सांगू शकत नाही.

०५. हे म्हणणे खरे नाही की, मला अपघातामुळे सहा लाखाच्या वर वैद्यकीय खर्च आल्याचे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मला दि.०२/०६/२०१८

रोजीच्या अपघातामुळे कुठलेही अपंगत्व आले नाही व वैद्यकीय खर्च देखील आलेला नाही. मी २०२० सालानंतरचे कुठलेही वैद्यकीय बिल प्रकरणात दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, २०२० ते २०२६ या कालावधीमध्ये मला कुठल्याही वैद्यकीय सेवेची गरज लागलेली नाही. माझ्या वय, व्यवसाय व उत्पन्नाचे कुठलेही कागदपत्र मी दाव्यात दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कंपनीच्या नोकरीतुन दरमहा १८,०००/- रूपये उत्पन्न कमवित असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अपघातापुर्वी कुठलाही कामधंदा करत नव्हतो. मी फेब्रुवारी / मार्च २०१८ पर्यंत कंपनीत काम करत होतो. मी माझ्या शेतीचा ७/१२ उतारे दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये अपंगत्व आलेले नसतांना मी खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2026.04.08 17:22:53 +0530

**(आर. बी. गिरी)**

सदस्य

मोटार अपघात-दावा न्यायाधिकरण,

मलकापूर

मलकापूर.

दिनांक - ०८/०४/२०२६.

- - - - -

## CERTIFICATE

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Mr.. V. S. Jadhav. (Jr. Clerk) |
| Date of order | : | 08-04-2026 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 08-04-2026 |
| Date of uploading | : | 08-04-2026 |